

# म्हसवंडी

नीलिमा जोरवर

गावातला पैसा गावात, गावातल्या गरजा गावातच भागणे आणि त्यातील सातत्य व नियमितता, यातून निर्माण झालेली ग्राम-अर्थक्रांती. वेगवेगळ्या प्रश्नांचे नियोजन करताना निर्माण झालेली ग्रामसंसद. त्याला साथ दिली गावातल्या पुरुषांनीही. गावामध्ये कोणतीही गटबाजी नको, कोणताही पक्ष नको.. म्हणून गेली अनेक वर्षे इथल्या निवडणुका या बिनविरोध होतात.





संध्याकाळचे ७ वाजले आहेत. काही माहिती घेण्यासाठी मी म्हसवंडीत होते. ग्रामपंचायतीच्या समोरच्या कट्ट्यावर बसून मी महिलांशी अनौपचारिक संवाद साधत होते. इतक्यात विठाबाई आज्जी तेथे आल्या. हातात कसल्याशा कागदाची वळकटी होती.

'दिलीप, हा माझा अर्ज. मला ३०,००० रुपये पाहिजे. मी उद्या सकाळीच निघेल लेकाकडे जायला'.

छाया तिथे बसलेली होती. तिने विठाबाई आजीची चौकशी केली, कुठे चालली? परत कधी येणार वगैरे.

'लेक्चर झाला आणि जर मला ऐकू आले नाही तर मला सांग' असे त्या तिला पुन्हा पुन्हा बजावत होत्या.

या दोन्हीही गोष्टी माझ्यासाठी नवीन होत्या. कसले लेक्चर? आणि ते समजून घेण्याची एवढी काय उत्सुकता? आणि ही बाई एक साध्या कागदावर अर्ज घेऊन येते रात्री ७ वाजता? तोही कर्ज पाहिजे म्हणून.. आणि तिला ही पण खात्री होती की या संध्याकाळच्या वेळीही तिची अडचण सोडवली जाणार होती. कशामुळे हे शक्य आहे?

म्हसवंडी, संगमनेरच्या दक्षिणेला पुणे जिल्ह्याच्या हद्दीवर जरासे पश्चिमेकडे असलेले हे छोटेसे १००० लोकसंख्येचे गाव. डोंगर-दऱ्या आणि मस्त हिरवेकंच रान.. आडमुठे रस्ते, माती, फुफाटा.. आणि पाण्यामुळे बहरलेली हिरवी शेती. असे काहीसे गावातील आजचे दृश्य आहे. परंतु २० वर्षांपूर्वी गावातील परिस्थिती वेगळी होती. ७-८ मैलाचा पायी प्रवास करून गावात पोहचायचे. गावातून शिकून बाहेर चाकरमानी झालेल्यांनाही हा पायी प्रवास अटळ. कारण कोणतेही वाहन जाण्यासाठी तिथे रस्तेच नाहीत, अशी अवस्था. गावात पाण्याचे नेहमीच दुर्भिक्ष. लोकसंख्या वाढली म्हणा की पाण्याचे स्रोत कमी झाले म्हणा... पण जेथे पुर्वांजाची पाण्याची तहान पूर्ण होत होती तेथे पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण झालेले. पाण्यासाठी वणवण रोजचीच. बाजरी हे एकच कोरडवाहू पिक. मोठ्या एकत्रित कुटुंबाची संख्याही जास्त. परिणामी पैसा पुरायचा नाही. सतत कुणा कुणा पुढे हात पसरायची वेळ. कधी-कधी अधुली-पायलीभर धान्यासाठी सावकार जमिनी ठेऊन घेत. परस्पर खरेदी करून घेत. मुलांचे लग्न लवकर जुळायचे नाही. गावात मुली द्यायला लोक नकार द्यायचे.

या गावावर नजर पडली ती काही ध्येयवेड्या लोकांची. यामध्ये होते.. वॉटर संस्थेचे संस्थापक फादर बाखर, ज्यांनी हजारो गावांचा पाण्याचा प्रश्न सोडवला. दुसरे होते वसंत टाकळकर, ज्यांनी समतल चर पद्धतीचा शोध लावून

माती आणि पाणी दोन्ही जागेवरच थांबवून पाणी जमिनीच्या पोटात अडवायला शिकविले. आणि बाकी होते गावातील व गावाबाहेर जाऊनही इथल्या लोकांशी इमान राखून असणारे गावकरी. या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून स्वत:हून स्वत:चा विकास साधण्यास गाव सज्ज झाले.. १९९८ साली गावात पाणलोट क्षेत्र विकास करायचे ठरले. या प्रकल्पात पावसाचे पडणारे पाणी अडणार होते, अडेल तिथे जिरणार होते. जमिनीच्या पोटात मुरलेले पाणी, विहिरी-बंधाऱ्यांतून थांबविले जाणार होते. सोबतच नवीन वृक्षलागवड करून जंगलही समृद्ध करायचे ठरवले गेले आणि त्यानुसार कामाला सुरुवात झाली. आधीच सततच्या दुर्भिक्षांमुळे, वैतागलेले गावकरी काम करण्यास तयार झाले. श्रमदान, चराई बंदी सर्व नियम पाळत गाव विकासाच्या दिशेने चालू लागले. जसजसे पाणी अडू लागले तसतसे भूगर्भातील पाण्याची पातळी वाढू लागली. याच संधीचा फायदा घेऊन सर्वप्रथम सुधारणा झाली ती शेतीमध्ये. पीकपद्धती बदलली. नगदी पिकांची लागवड होऊ लागली. गावात येण्यासाठीचा गाडी रस्ता लोकवर्गणीतून तयार झाला.



याच प्रकल्पांतर्गत महिलांचाही विकास व्हावा, याचाही प्रयत्न केलेला होता. यासाठी महिलांचे बचत गट काम करत होते. एका विशिष्ट ध्येयाने झपाटलेल्या या महिला सर्वतोपरी महिलांना जोडून घेण्याचे प्रयत्न करत.

नंदाताई या ज्येष्ठ महिला सदस्या सांगत होत्या, 'आधी महिलांची स्थिती तर अतिशय वाईट.. अस्मानी आणि सुलतानी असे दोन्हीही छळ त्यांचे होत असत. पाण्याच्या कमतरतेमुळे घरकाम, कुटुंब, जनावरे यासाठी लागणाऱ्या पाण्याची तरतूद यांनाच पाहावी लागत. त्यासाठी काबाड कष्ट होतेच.. परंतु सुलतानी सत्ता गाजवायला सासुरवास असेच. त्या काळी ५ पैसे सुद्धा होते, परंतु सासुरवाशिणीच्या हातावर कुणी कधीच ते सुद्धा ठेवत नसत..डोक्याला तेल, अंगाला लावायला साबण अशा गोष्टीही कधी मिळायच्या नाहीत. चौकातून जाताना पायातल्या चपला हातात काढून घ्यायच्या. कधी कुणा पुरुषाकडे बघायचे नाही.. एखादा शब्द जरी कुणासोबत बोलले की लगेच घरी छळ व्हायचा. आज ही परिस्थिती बदलली ती केवळ संस्थेच्या माध्यमातून झालेल्या शिक्षणामुळे.'

गावातलेच संघटक असणारे सुभाष इथापे म्हणतात, 'पाणलोटामुळे क्षेत्रीय उपचार केले जातात पण हे उपचार होण्यापूर्वी लोकांवर मानसिक उपचार केले जाणे अतिशय गरजेचे असते. तरच ते काम कायमस्वरूपी टिकू शकते. त्यावेळी गावात घरोघरी जायचे. लोकांना सुरू होणाऱ्या कामाबद्दल माहिती द्यायची. इतर ठिकाणी



सहलीला नेऊन जिथे चांगले काम झाले आहे ते प्रत्यक्ष लोकांना दाखवायचे. मग जास्त काही बोलण्याची गरज नसे. कधी-कधी किरकोळ वैयक्तिक वाद असे, त्यावरूनही लोक गावकीच्या कामाला विरोध करत, अशावेळी त्यांच्या घरी एकत्र सर्वांनी जाऊन त्यांची काय अडचण आहे ते समजून घ्यायचे व चर्चेतून तो प्रश्न मार्गी काढायचा. कुण्या महिलेला जर बैठकीसाठी येऊन दिले जात नसेल तर तिच्या घरी सर्व इतर महिला एकत्र येऊन मोर्चा काढत. घरातला पुरुष आपोआप शरमिंदा होई आणि त्याच्या घरच्या महिलेला पाठवायला तयार होत असे. त्यांचा सातत्य व पाठपुरावा ही दोन महत्त्वाची तंत्रे उपयोगी पडली. या लोकांच्या विशिष्ट मानसिकतेवर केलेल्या अनुभवाची प्रचिती आज पदोपदी पाहायला मिळते. प्रत्येकाला गावातले काम हे आपले काम वाटते. त्यासाठी वेळ देण्याची प्रत्येकाची तयारी असते. विशेषतः गावातल्या महिला सजग बनल्या आहेत. या महिलांनी इतकी आघाडी कशी घेतली त्याची ही माहिती मोठी रोचक आहे.

म्हसवंडीच्या कथेची खरी सुरुवात होते ती इथेच. महिलांनी जिद्दीने निर्माण केलेल्या सामुदायिक संपत्तीच्या कथेने. पाणलोट प्रकल्प पूर्ण होताना, २.५ लाखांचा महिला विकास निधी नाबार्डकडून महिलांसाठी देण्यात आला. या निधीचे व्यवस्थापन होण्यासाठी प्रत्येक गटाच्या दोन महिला सदस्य, एक सहकारी संस्था प्रतिनिधी, एक स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी आणि एक पुरुष संघटक अशा १९ लोकांची समिती उभारण्यात आली.

झाले असे होते की, निधीचा योग्य विनियोग करण्यासाठी महिला विकास समिती तयार झाली होती, मिळालेला विकास निधी होताच, त्या बरोबर यांची बचत सुरूच होती.. परंतु सर्व महिलांना एकत्र येऊन बसण्यासाठी जागाच नव्हती. त्यासाठी काहीतरी छोटीशी इमारत असणे गरजेचे होते. इतर व्यवहार पाहून इमारत बांधावयास पुरेसा पैसा नव्हता. सर्व महिलांनी ठरवले की, सिमेंट, वाळू, विटा असे सामान बाहेरून विकत आणावे आणि इतर मजुरीचा वगैरे खर्च वाचवण्यासाठी आपणच श्रमदान करावे. ठरले तर मग..! काम सुरू झाले आज गवंड्याच्या हाताखाली चारजणी तर उद्या दुसऱ्या चारजणी श्रमदान करत असत. शेवटी गवंडी काम करणाऱ्या माणसाने न राहवून त्यांना विचारले, 'ताई, तुमच्या गावात मजुरांचा काही प्रश्न आहे का? रोज नवीन नवीन महिला काम करत असतात?'

त्यावर महिलांनी मोठ्या आत्मीयतेने त्यांना सांगितले, ''भाऊ ही इमारत महिलांच्या सामुदायिक मालकीची आहे. मजुरी देण्यासाठी पैसे नसल्यामुळे आम्ही श्रमदानासाठी येतो.''

हे ऐकून तो गवंडी म्हणाला, ''आमच्या गावातल्या महिला श्रमदान तर सोडा पण कधी एकत्र येऊन बसत पण नाहीत. माझ्यातर्फे तुम्हाला एक

वाळूची गाडी मोफत!''

पुढे विटावाल्याला हे माहीत झाले त्यानेही विटा मोफत दिल्या, सरीवाल्याने फरशीसाठी मदत केली, बँकेने काही रक्कम दिली. अशाप्रकारे मागे न हटता..महिलांनी ज्या जिद्दीने कामाला सुरुवात केली, त्यात अनेकांचे हात लागत गेले..आणि महिलांची स्वत:ची हक्काची अशी इमारत श्रमदानातून तयार झाली. त्या इमारतीचे नाव ठेवले गेले 'महिला श्रमदान वास्तू' नाव ठेवण्यातही कल्पकता आहे. म्हणजे या मुख्य नावाशिवाय एका बाजूच्या भिंतीवर नाव आहे 'महिला मळादेवी समिती' तर दुसऱ्या भिंतीच्या बाजूने नाव आहे 'महिला व्यवसाय व प्रशिक्षण केंद्र'. तिन्ही बाजूने तीन नावे. अशी वेगवेगळी नावे देण्यामागे महिलांचा आत्मविश्वास तर आहेच परंतु या वास्तुत महिला समितीचे कामकाज चालते तसे काही प्रशिक्षणही सुरू असते. ही इमारत महिलांच्याच वेगवेगळ्या कामांसाठी वापरली जाते म्हणून नावेही वेगवेगळी.

या वास्तुला उभे करण्यात ज्यांनी कष्ट केले होते, त्यांच्याशी जोडलेल्या प्रत्येक गोष्टीत त्यांना आपलेपणा वाटे. त्यातूनच महिलांसाठी आरोग्याचे प्रश्न सोडवण्यासाठी आरोग्य विभाग पुढे आला. गावात वेगवेगळ्या सहली देश-विदेशातूनही येत. यासाठी अभ्यास सहल विभाग, आलेल्या पाहुण्यांना योग्य दरात जेवण देण्यासाठी भोजन विभाग, शालेय पोषण आहार शिजवण्यासाठी पोषण आहार विभाग, घरोघरी गॅस असले पाहिजे व ते गावातच उपलब्ध व्हावे यासाठी ७५% कुटुंबाना एकाच वेळी ग्यास मिळाला पाहिजे असे ठरविण्यात आले. यासाठी ज्या कुटुंबांची ऐपत नव्हती त्यांना बचत गटाच्या माध्यमातून कर्ज देण्यात आले, अर्थात ते परतफेडीसाठीही योग्य नियोजन केले गेले. पुढेही त्याचे वितरण व्यवस्थित व्हावे यासाठी पुन्हा गॅस विभाग स्थापन करण्यात आला. दोन वर्षांत सर्व कर्ज परत आले. या सर्व विभागांतून येणारा पैसा हा पुन्हा महिला समितीकडे येत होता. या त्यांच्या जमा झालेल्या रकमेतून आजपर्यंत कोणताही वैयक्तिक लाभांश दिला गेला नव्हता. यासाठी असे ठरले की, दिवाळीसाठी लागणारा सर्व शिधा महिला समितीकडून देण्यात येईल. त्यासाठी पुन्हा निर्माण झाला दिवाळी शिधा वाटप विभाग. यामध्ये रवा, साखरेपासून ते वेलची, जायफळ पर्यंत सर्व वस्तू महिला समितीकडून प्रत्येक सदस्याला मिळाला.

आज महिलांचे ३८ गट गावात सुरू आहेत. कुणाचीही तक्रार नाही, वाद विवाद नाही की भांडण नाहीत. वेगवेगळे विभाग स्थापन करणे व ते सुरळीत चालवणे, तेही एका मोठ्या कालावधीपासून.. या सर्वांचे श्रेय जाते ते त्यातील सूक्ष्मपणे केलेल्या नियोजनाला. प्रत्येक गोष्टीचे इतके सुरेख नियोजन येथे आहे. अगदी मिटींगची माहिती देण्यापासून ते कर्ज फेडीच्या व्यापक नियम बनविण्यापर्यंत. पुन्हा या सर्वांची अंमलबजावणी होण्यासाठीचेही नियोजन. इथे मिटींगच्या माहितीसाठी अथवा बचतीचे पैसे गोळा करण्यासाठी कुणाच्याही घरी कुणीही जात नाही. मिटींगच्या माहितीसाठी लाउड स्पीकरवर ठराविक अंतराने दोनदा घोषणा केली जाते. या घोषणेला त्या अनौन्स किंवा लेक्चर असे म्हणतात. एकदा अनौन्स झाले की सर्व महिला जमा होतात. मळ्यामध्ये राहणाऱ्यांना मिटींगसाठी येणे कधी शक्य नसते, कधी वाघाची भीती असते, तेव्हा दुसऱ्या दिवशी शेतात काम करताना, 'काल काय झाले पुढे काय ठरले?' अशी सर्व माहिती त्या महिला घेतात. घेतलेले कर्ज परत करण्यासाठी तीन पर्याय आहेत उत्तम, मध्यम आणि अंतिम. उत्तम साठी ५० पैसे व्याजदर ते अंतिम साठी २ रुपये व्याजदर. हे नियोजन इतके सुंदर आहे की गावातली १००% कर्जवसुली झाली आहे. समितीत सर्व महिला सदस्य व मी एकटाच पुरुष असायचो. सुरुवातीला महिलाना घरून खूप विरोध असायचा. घरचे येऊन देत नसत, कधी मारही खावा लागे.. खूप हाल सहन करून त्या इथपर्यंत पोहचत. त्यामुळे त्यांनी यासाठी काय हालअपेष्टा सहन केल्यात, हे



मी सर्व पाहिले आहे. आता उभ्या राहिलेल्या या कामामुळे पुरुषांचा विरोध मावळला. आता तेच त्यांना मिटींगची आठवण करून देतात.

गावातच एक छोटीशी बँक आहे. ५०,००० पर्यंतची तरतूद कोणत्याही क्षणी इथे होऊ शकते. समितीचे कामकाज रोज सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत चालू असते. हे ऑफिस कोणत्याही दिवशी बंद नसते. सर्व रकमा आधी इथे जमा होतात, मग त्या त्या गटाकडे वितरित केल्या जातात. या गटांसोबत सतत सक्रीय असलेले दिलीप सातकर सांगत होते. मुख्य रजिस्टर चोरी झाले अथवा काही कारणाने नष्ट झाले तरी सर्व टिपण/हिशोब प्रत्येक गटाकडे असणाऱ्या दोन वह्यांमध्ये लिहिलेला असतो. इतके सूक्ष्मनियोजन, हेही इथल्या यशाचे एक गमक असू शकते. म्हणूनच विठाबाई आज्जीला इतक्या संध्याकाळी आणि फक्त एका अर्जावर रक्कम लगेच मिळाली.

गावातला पैसा गावात, गावातल्या गरजा गावातच भागणे आणि त्यातील सातत्य व नियमितता, यातून निर्माण झालेली ग्राम-अर्थक्रांती. वेगवेगळ्या प्रश्नांचे नियोजन करताना निर्माण झालेली ग्रामसंसद. त्याला साथ दिली गावातल्या पुरुषांनीही. गावामध्ये कोणतीही गटबाजी नको, कोणताही पक्ष नको.. म्हणून गेली अनेक वर्षे इथल्या निवडणुका या बिनविरोध होतात. गावातून बाहेर पडलेले गावसुपुत्र गावाशी आपली नाळ टिकवून आहेत. या महिलांनी केलेल्या कामाचा अभिमान त्यांनाही नक्कीच वाटत असावा. 'म्हाताऱ्या बापाने आपल्या चार मुलांना काही गव्हाचे दाणे देऊन सांभाळायला सांगितले त्यातील प्रत्येक मुलाने आपापल्या पद्धतीने ते सांभाळले, पण त्यातला एक मुलगा हुशार होता, त्याने ते दाणे पेरणी करून वाढविले व गव्हाचे भांडार उभे केले तसेच काहीसे या गावात घडले.' अनेक ठिकाणी स्थापन केलेले बचत गट काही वर्षानंतर बंद पडतात. गट फोडून, बचत वाटून घेतली जाते. परंतु म्हसवंडीत ८ गटांचे आज ३८ गट झाले आहे. महिलांची बचत ६० लाखाच्या वरती गेली आहे. संस्थेने दिलेल्या माहितीचा, ज्ञानाचा, संधीचा उपयोग कायमस्वरूपी घेता आला पाहिजे. 'आम्हाला वॉटर संस्थेने जे शिकवले होते, ज्या पद्धतीने प्रशिक्षण दिले होते त्याचाच उपयोग आम्ही प्रत्यक्षात केला', दिलीप सातकर हे मोठ्या अभिमानाने सांगतात.

■